घटकसंच 12

# सामाजिक शास्त्रातील अध्यापन पद्धती (उच्च प्राथमिक स्तर)

## अवलोकन :

सर्वसामान्यत: शिक्षणात प्राथमिक स्तरावर सामाजिक शास्त्राचे स्थान महत्त्वाचे आहे. विविध विषयातील आशयात मानवाचा निसर्ग व समाज यांच्याशी वेळ, काळ व संस्था पातळीवरील आंतरक्रियांचा समावेश असतो. सामाजिक शास्त्रे (वैज्ञानिक) कुतूहलामुळे प्रश्नांकडे जातात, ज्यांच्या पद्धतीत नैसर्गिक व भौतिक विज्ञानाचा समावेश होतो. सामाजिक विज्ञानात मानवी मूल्ये–स्वातंत्र्य, विश्वास आणि विद्यार्थ्यांमधील क्षमता; ज्यात वैयक्तिक व सामाजिक स्तरांवरील सर्व गोष्टींचा विचार होतो.

या विषयात तद्नुभूती, समानानुभूती, समानता, स्वातंत्र्य, न्याय, आत्मसन्मान, एकी, मैत्री, आधिक्य ही मूल्ये रुजविण्यास प्राधान्य दिले जाते. सामाजिक शास्त्रातील प्रत्येक विद्या शाखेत घटना, कृती, प्रक्रिया यांवर आकलन, विश्लेषण, मूल्यमापन आणि तार्किक व तर्कसंगत दृष्टिकोन या सर्वांचा समावेश असतो.

सामाजिक शास्त्रांमध्ये अध्ययन व अध्यापन पर्यावरण, शांतता निर्माण करणारी मूल्ये, लिंगभेद, अनुसूचित जाती व जमाती आणि अल्पसंख्याक यांचे परस्परांत योग्य रीतीने एकत्रीकरण अपेक्षित आहे व तसे प्रयत्न होत असतात. सामाजिक शास्त्रांच्या ज्ञान शाखांच्या स्थितीत NCF (National Curriculumn Frame Work) व NFGTSS हे टोकाचे बदल घडवून आणत आहेत.

| | कडून (From) | कडे (To) |
|---|---|---|
| 1. | माहिती मिळविण्याचे एकमेव साधन म्हणजे पाठ्यपुस्तक. | आशय समजावून घेण्यासाठी पाठ्यपुस्तक हे अनेकांपैकी एक साधन आहे. |
| 2. | पाठ्यपुस्तक म्हणजे जणू काही एक कुलूपबंद पेटी आहे. | पाठ्यपुस्तक हे वेळोवेळी गरजेप्रमाणे बदलणारे, सुधारणारे (Document) (कागदपत्रांचा संच) आहे. |
| 3. | पूर्वी घडून गेलेल्या सर्व गोष्टींची त्यात नोंद असते. | यांमध्ये अनेक गट व विभाग यांचा समावेश असतो. |

हे अनुभवाला आले आहे की, सामाजिक शास्त्रातील पाठ्यघटक विद्यार्थांच्या कल्पना व अनुभव ऐकणे, इतरांमध्ये वाटून देणे, इतरांच्या कल्पना, वस्तुस्थिती यांचे स्वभाषेत चिकित्सकपणे मूल्यमापन करणे. या अभ्यास विषयामुळे विद्यार्थी त्यांच्या स्वानुभवानुसार विविध संबोधांना सामोरे जातात. ज्ञानाचा सुलभक या नात्याने आपण मोकळ्या वातावरणातील चर्चा, वादविवादांचे आयोजन, विविध स्रोतांद्वारे विद्यार्थ्यांना वाचनास प्रवृत्त करणे, अध्ययनाला मदत करणाऱ्या तंत्रज्ञानाच्या आधारे त्यांच्या अभ्यास विषयांमधील ताज्या घडामोडी यांची माहिती देतो. आपल्या विषयातील संबोधांचे स्पष्टीकरण सोप्या भाषेत करण्यामध्ये आपणास अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत असेल. विषयाचे आकलन व स्पष्टीकरण व्यवस्थित व्हावे म्हणून आपण विविध अध्ययन–अध्यापन साहित्य वापरू शकता.

## अध्ययनाची उद्दिष्टे

- सातत्य व बदल या अनुभवजन्य घटनांचा स्वीकार करण्यासाठी सामाजिक शास्त्राच्या औचित्याचे आकलन होणे.
- नैसर्गिक व सामाजिक वातावरणात आपल्या विषयांचा अंतर्गत संबंध ओळखणे व त्याद्वारे विषयाचे औचित्य ध्यानात घेणे/समजणे/ओळखणे.
- न्याय, स्वातंत्र्य, समता, आत्मसन्मान, ऐक्य व प्रामाणिकपणा या भारताच्या राज्यघटनेत समाविष्ट असलेल्या मूल्यांची योग्य ती दखल, लोकशाही व धर्मनिरपेक्ष समाजवादी भारतीय समाजाची बांधणी करणे.
- समाजाच्या विविध भागांमध्ये होणाऱ्या क्रिया व त्यांवर होणारे परिणाम यांच्यामधील कारणे व परिणाम यांचे वर्गीकरण व तुलना घडणाऱ्या विविध भागांच्या संदर्भात करणे.
- विविधतेमधील एकता, लोकशाही, विकास, विविध घटक व बले जी आपली संस्कृती व कला समृद्ध करतात.
- विविध दृष्टिकोनांमधील वैविध्य व त्यामागील नैसर्गिक, सामाजिक अद्भूत घटना यांच्या गरजेवर चर्चा करणे.
- वैविध्य, लिंगभेद, विशिष्ट गरजा असलेल्या मुलांच्या गरजा जाणून घेणे, समाजातील विविध घटनामंधील अंतर कमी करणे.

### विषयाची तोंडओळख :

उच्च प्राथमिक स्तरावर सामाजिक शास्त्रामध्ये भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र हे विषय समाविष्ट होतात.

### भूगोल :

विविध देश व राज्ये यांतील परस्परसंबंध वाढविण्यामध्ये भूगोल विषयाची भूमिका महत्त्वाची आहे. उच्च प्राथमिक स्तरावर विद्यार्थी–विद्यार्थिनींना पृथ्वी, मानवाचे वसतिस्थान व इतर घटक यांचा परिचय करून दिला जातो. त्यांना त्यांचा प्रदेश, राज्य, देश यांचे मोठ्या (खंड/विश्वाच्या) संदर्भात अध्ययनास प्रवृत्त केले जाते. यामध्ये आर्थिक स्रोतांचे वैश्विक विवरण, पर्यावरण, लिंगभेद, उपेक्षित गट या मुद्द्यांवरही भर दिलेला असतो. ते ही वैश्विकत्वाच्या/जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत समाविष्ट होऊ शकतात.

### इतिहास :

हा उच्च प्राथमिक स्तरावर प्रागैतिहासिक काळापासून आतापर्यंतच्या भारतीय इतिहासाशी संबंधित आहे. इयत्ता सहावीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकात काळाचा मोठा परिघ आहे. त्यात मानवाने केलेली शिकार व संकलन/संग्रहण यांपासून पूर्वीच्या काळी स्थापन केलेली संस्कृती वारसा, मानवी जीवन या सर्वांसह असलेली राजवट होय. इयत्ता सातवीच्या पाठ्यपुस्तकात मध्ययुगीन काळातील घटनांपासूनचा इतिहास आहे. इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकात सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रक्रिया ज्यात ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेपासून ते स्वातंत्र्योत्तर भारत या सर्वांचा समावेश आहे. त्या त्या काळात उपलब्ध साधनांच्या आधारे विकास/प्रगतीची कल्पना देणे हे एक सर्व सामान्य उद्दिष्ट आहे.

विद्यार्थ्यांना नकाशे, कालरेषा, व्यक्ती अभ्यास या विविध शैक्षणिक साधनांद्वारे योग्य आकलन व्हावे म्हणून अध्यापन केले जाते.

### सामाजिक व राजकीय जीवन :

भारतीय लोकशाही व अर्थव्यवस्था यांचे कार्य कसे चालते हे स्पष्ट करणारे संबोध आणि क्रिया यांचे आकलन होण्यावर या विषयात भर दिला आहे. पाणी, आरोग्यविषयक यंत्रणा, वाहतूक (रस्ते), वीज पुरवठा या व इतर सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देणे. या सर्व कामांसाठीच्या संस्था निर्माण करणे व त्यांच्या कामांवर लक्ष केंद्रित करणे. आर्थिक, समाजिक व राजकीय घटकांमधील परस्परसंबंधाचा समाजातील विविध घटकांमधील भागांवर होणारा परिणाम माहीत करून घेणे. मुख्य उद्दिष्ट हे आहे की, भारतीय राज्यघटनेचे आदर्श, लोकशाहीची कार्यपद्धती आणि इतर तत्सम कार्यरत संस्था यांची माहिती करून घेण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे.

## विविध विषयांसंदर्भात वर्गातील विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्ती :

उच्च प्राथमिक स्तरावरील सामाजिक शास्त्रांच्या अध्ययन निष्पत्ती या ज्ञान, कौशल्ये आणि अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थी इतर सर्व अपेक्षा पूर्ण करतात.

- काळ व स्थळ यांचा विचार न करता त्यांचे राजकीय, सामाजिक व आर्थिक मुद्दे त्यांच्या जीवनावर परिणाम करतात.
- तसेच विविध भागांतील वैविध्य, त्यांच्याकडील संसाधने भारताच्या विविध ठिकाणी स्वातंत्र्योत्तर शेती, उद्योग क्षेत्रात झालेले बदल, यांचा भारतीय लोकशाहीशी असणारा संबंध या सर्वांचाच वर उल्लेख केलेल्या सर्व क्षेत्रांवर परिणाम होतो.
- विद्यार्थी नैसर्गिक साधनसंपत्ती, शेती व जीवनमान यांचे इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या परिप्रेक्ष्यात विश्लेषण करतात.
- विशिष्ट वर्गासंदर्भात विशिष्ट अध्ययन निष्पत्तीबाबतचे अध्यापन शास्त्र सुचविलेल्या अध्यापन शास्त्रातील नीती, त्यांचे आराखडे तयार करता येतात आणि विद्यार्थ्यांना व्यक्तिशः किंवा गटात काम करताना व्यापक अनुभव येतात.

| वर्ग | सूचित केलेल्या अध्यापनशास्त्रीय प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|
| सहावी | • आकृत्या, प्रतिकृती, दृक्श्राव्य साधने यांचा वापर पृथ्वीची गती समजण्यासाठी होतो. | • विश्वाच्या नकाशातील, पृथ्वीवरील विविध रेषा, भारताचे शेजारी देश हे अक्षवृत्ते, रेखावृत्ते, विषुववृत्त यांच्या आधारे ठरविता येते. |
| | • खगोलशास्त्रातील घटना उदा. इंद्रधनुष्य, विविध ग्रहणे, धूमकेतू, उल्कापात तसेच विविध तारे, ग्रह, उपग्रह (चंद्र) यांचे शिक्षक किंवा पालक यांच्या मदतीने निरीक्षण करणे व त्या आधारे खगोलशास्त्रीय घटनांचे आकलन होणे. | • पारंपरिक चिन्हांच्या आधारे दिशा, वैशिष्ट्य, प्रमाण (मोजमाप) दर्शविणारा एक आराखडा तयार करणे. |
| | • विद्यार्थी शिकारी, अन्न तयार करणारे, हडप्पा संस्कृती, जनपद, महाजनपद, साम्राज्य, बुद्ध व महावीर यांच्या जीवनातील महत्त्वाची ठिकाणे, कला व स्थापत्याची विविध उदाहरणे या सर्वांची ठिकाणे, स्थळे नकाशाच्या साहाय्याने दर्शविणे. | • त्या काळातील इतिहासाची नव्याने मांडणी करताना साहित्य (वाङ्मय) पुरातन साधने कोणती ते ओळखणे व ठरविणे. |
| | • वैविध्य, भेदभाव, शासनव्यवस्था व उपजिविका यांवरील चर्चेत सहभागी होणे. | • योग्य मार्गाने समानता व असमानता यांच्यात विविध पातळीवर फरक करता येणे. |
| सातवी | • ऐतिहासिक ठिकाणे, राज्य, विविध हवामान प्रदेश आणि अन्य साधने ओळखण्यासाठी/ठरविण्यासाठी नकाशे/पृथ्वीगोल यांचा शोध घेणे. | • वातावरणातील विविध घटकांचे वर्णन व त्यांतील परस्परावलंबित्व स्पष्ट करतो. |
| | • पृथ्वी गोलाच्या अंतर्भागातील समुद्राच्या पाण्याच्या हालचाली, जमिनीच्या विविध प्रकारांची निर्मिती यांचे आकलन होण्यासाठी आकृत्या, प्रतिकृत्या, दृक्श्राव्य माध्यमांचा वापर करणे. | • इतिहासातील विविध कालखंडांचा अभ्यास करण्यासाठी उदाहरणे पुरविणे. |

| वर्ग | सूचित केलेल्या अध्यापनशास्त्रीय प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|
| | • नवीन संग्रहणीचा विकास व या काळात घडून गेलेल्या विविध घटनांची कालरेषा तयार करणे.<br>• ग्रामीण व शहरी भागातील मुली व स्त्रिया यांच्या जीवनमानाबद्दल वर्णनात्मक व चिकित्सक विचार मांडणे.<br>• प्रगत समाज निर्माण करण्यासाठी ज्या स्त्रियांनी काम केले त्यांच्याबद्दल तोंडी व लेखी सादरीकरण करणे. | • मध्ययुगीन काळात ज्या विविध ऐतिहासिक घटना घडल्या त्यांचा परस्परांशी संबंध जुळविणे.<br>• भारताच्या विविध राज्यांतील, विविध क्षेत्रांतील कामगिरी केलेल्या यशस्वी महिला यांना ओळखणे. उदा. कल्पना चावला, पी.टी. उषा.<br>• योग्य उदाहरणांच्या साहाय्याने विविध क्षेत्रांत लक्षणीय कामगिरी करणाऱ्या स्त्रियांच्या योगदानाची माहिती असणे. |

## सामाजिक शास्त्रातील देवाण-घेवाणीची उदाहरणे :

### संकल्पना - पृथ्वीगोल : अक्षवृत्त व रेखावृत्त

### घटकसंचाचा आशय आराखडा

इयत्ता सहावीच्या विषयात समाविष्ट असलेल्या घटकांच्या अध्ययन निष्पत्तींशी हा घटकसंच संबंधित आहे. यामध्ये विषयाची खोली व उंचीच्या संदर्भात विषयाचे आकलन हे आंतरक्रिया व विद्यार्थी सहभागात्मक दृष्टीने होण्यावर भर असतो.

या स्वयंघटकाचे सातत्यपूर्ण मूल्यमापन होत असते.

### अध्ययनाची उद्दिष्टे :

विद्यार्थी पुढील गोष्टी ओळखू शकतील.

- अक्षवृत्ते
- रेखावृत्ते
- अक्षवृत्त व रेखावृत्त यांतील फरक
- दक्षिण व उत्तर ध्रुव
- विषुववृत्त
- कर्कवृत्त
- मकरवृत्त
- प्रधान/मुख्य रेखावृत्त व अक्षवृत्तांनुसार विश्वातील ठिकाणे
- अक्षवृत्त व रेखावृत्त यांच्या मदतीने नकाशातील स्थाने.

### विषयनिहाय व वर्गनिहाय अध्ययन निष्पत्ती :

पृथ्वी हा विश्वाचा एक अविभाज्य घटक आहे. (True Model) रेखावृत्त व अक्षवृत्त विचारात घेऊन पृथ्वीवरचे एखादे ठिकाण ठरविता येते. पृथ्वीवरील अक्षवृत्ते व रेखावृत्ते ओळखून विद्यार्थ्यांमध्ये अवकाश विषयक जाणीव निर्माण होण्याचे कौशल्य गरजेचे आहे.

## अध्ययन निष्पत्ती प्राप्त करण्यासाठीचे थोडक्यात अध्यापनशास्त्र :

पृथ्वीगोल व जगाच्या नकाशावरील अक्षवृत्ते व रेखावृत्ते ओळखण्यासाठी विविध अध्यापनशास्त्रीय पद्धतींचा वापर करू शकतो. यामुळे विद्यार्थ्यांना पृथ्वीचा गोल व नकाशे वापरण्याची वारंवार संधी दिली जाते. वर्गात अक्षवृत्ते, रेखावृत्ते, पृथ्वीचा गोल, सर्व संबंधित नकाशे आणि त्रिमितीय प्रतिकृती या सर्वांच्या उपयोगाने विद्यार्थी–विद्यार्थिनींमध्ये विविध आंतरक्रिया/चर्चा घडतात. विषयाच्या संकल्पना स्पष्ट होण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांशी स्थानिक पातळीवर संवाद साधतात. अध्ययन–अध्यापन प्रक्रिया सुरू असते तेव्हा विद्यार्थी–विद्यार्थिनी किती उत्साहाने कृतियुक्त सहभागी होतात, किती व कोणते प्रश्न विचारतात व त्या त्या विषय–मुद्द्यांच्या इतर विषय–संकल्पनांशी कशा जोडतात या सर्व मुद्द्यांच्या आधारे विद्यार्थी–विद्यार्थिनींचे मूल्यमापन होते.

*शिक्षक पृथ्वीचे चित्र दाखवून सुरुवात करू शकतात. तुम्ही पृथ्वीचे अंतराळातील चित्र पुस्तकामध्ये किंवा टी.व्ही.वरती पाहिले आहे का? असे विचारू शकता. शिवाय पृथ्वीच्या चित्रामध्ये पाहिल्याप्रमाणे पृथ्वीचा रंग व आकाराबाबत ही विचारू शकता. विद्यार्थ्यांच्या निरीक्षणाची नोंद करा.*

पृथ्वीची प्रतिकृती म्हणून विश्वाची ओळख करून घ्या. विद्यार्थी–विद्यार्थिनींचे छोटे छोटे वैशिष्ट्यपूर्ण गट तयार करावेत व प्रत्येकाला त्या विश्वकोशाला स्पर्श करून त्याचा आनंद घ्यायला प्रोत्साहन द्यावे. विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना/अनुभव परस्परांमध्ये वाटून घ्यायला सांगावे.

**प्रश्नसंच :** शिक्षकांकडून एका कार्डांचा संच तयार करून घ्यावा. विद्यार्थ्यांच्या निरीक्षणाची नोंद करा. प्रत्येक कार्डवर जगामधील/भारतातील कोणत्याही ठिकाणाची नावे लिहा. प्रत्येक विद्यार्थ्यास लकी ड्रॉ द्वारे एक कार्ड निवडण्यास सांगा व पृथ्वीगोल अथवा नकाशावरती तो दाखविण्यास सांगा.



**आकृती 1 : विद्यार्थी वर्गामध्ये पृथ्वीगोलाचे निरीक्षण करत आहेत.**

**विद्यार्थ्यांनी निरीक्षणे कागदावर नोंद करा.**

**विद्यार्थ्यांचे असे मूल्यमापन करा.**

- पृथ्वी गोलावरील महत्वाचे घटक दाखविण्यासाठी विद्यार्थ्याने केलेले प्रयत्न.
- विद्यार्थ्यांना पृथ्वीगोलावरील वैशिष्ट्ये ओळखण्यासाठी/शोधण्यासाठी प्रवृत्त करणे.

विद्यार्थ्यांमध्ये परस्परांत सहकार्य, तदनुभूती, समानानुभूती व माहितीची देवाणघेवाण होते. विशिष्ट गरजा असणाऱ्या समावेशक वर्गखोल्यांमध्ये विशिष्ट तंत्राच्या आधाराने तयार केलेले विश्व व इतर संबंधित वस्तू यांमुळे पृथ्वीचा आकार, अक्षवृत्ते व रेखावृत्ते सर्व समजू शकेल.

**उत्तर ध्रुव**




**दक्षिण ध्रुव** **स्पर्श पृथ्वीगोल**

**आकृती 1.2 : पृथ्वीगोल**

*विद्यार्थी परस्परांमध्ये चर्चा करतात.*

- जर विश्व ही पृथ्वीची प्रतिकृती असेल तर आपण कोठे राहत असू? काहीजण म्हणतील आम्ही विश्वात राहतो तर काहीजण म्हणतील आम्ही विश्वाच्या पृष्ठभागावर राहतो.
- पृथ्वी एका आधारावर स्थिर आहे का? की विश्वासारखी दोन्ही बाजूंनी फिरत आहे?
- विश्वाचा मुख्य रंग निळा का आहे?

*विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून शिक्षक सहकार्य करतील.*

शिक्षक स्पष्ट करतील की आपण पृथ्वीच्या पृष्ठभागावर राहत आहोत तिच्या आत नाही. तिला उत्तर व दक्षिण असे दोन ध्रुव आहेत. जेव्हा आपण एखादी सुई उभी टांगतो तेव्हा ती दक्षिणोत्तर स्थिर राहते. त्या टोकांना उत्तर व दक्षिण ध्रुव म्हणतात. ती सुई एका काल्पनिक रेषेभोवती फिरते. विश्व देखील स्थिर नाही. ज्याप्रकारे सुई फिरते किंवा कुंभाराचा माठ फिरतो तसे विश्वही फिरते. विश्व पूर्व व पश्चिम या दोन्ही दिशांनी फिरते मात्र पृथ्वी पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते. विश्वावरील जमीन व पाणी दर्शविणाऱ्या विविध रंगांचे निरीक्षण करा.

*आपण विश्वामध्ये कोठे राहतो यासारखे प्रश्न विचारून अध्ययनाचे सुलभन करावे.*

*विद्यार्थी परस्परांत चर्चा करतात.*

- आपला देश विश्वावर कोठे आहे?
- विश्वाला/पृथ्वीला खूप अक्षवृत्ते व रेखावृत्ते का आहेत?
- ही अक्षवृत्ते व रेखावृत्ते दर्शविणाऱ्या रेषा जमिनीवर पण आहेत का?
- विश्वात दिशा कशी शोधायची?
- विश्वावर/पृथ्वीवर अक्षवृत्ते व रेखावृत्ते का काढली आहेत?
- बरीच अक्षवृत्ते व रेखावृत्ते का असतात?

**शिक्षक साधने व संधी विश्वाची ओळख करून देण्यासाठी उपलब्ध करून देतात.**

पृथ्वीप्रमाणे कोणतेही स्थान निश्चित करणे, वर्णन करणे हे अवघड असते. आपल्याला ते ठिकाण माहीत करून घेण्यासाठी विशिष्ट संदर्भ लागतात. उत्तर व दक्षिण ध्रुव हे ते दोन संदर्भ बिंदू आहेत. अक्षवृत्ते व रेखावृत्ते या दोन्ही काल्पनिक रेषा आहेत. ज्या विश्व व नकाशात आहेत पण पृथ्वीच्या पृष्ठभागावर नाहीत.

पृथ्वी सारख्या गोलावरती एखाद्या घटकांचे स्थान दाखवून त्याचे स्पष्टीकरण करणे अवघड आहे. यासाठी विशिष्ट संदर्भाचा शोध घ्यावा लागेल. दक्षिण ध्रुव व उत्तर ध्रुव हे दोन संदर्भ यासाठी वापरावे. अक्षांश व रेखांश काल्पनिक रेषा असून त्या पृथ्वी गोलावरती व नकाशावरती दाखविल्या जातात. परंतु प्रत्यक्षात पृथ्वीच्या पृष्ठभागावरची अस्तित्वात नाहीत.

**अक्षवृत्ते :** उत्तर ध्रुव ते दक्षिण ध्रुव ज्यांच्यात विश्वाचे उत्तर व दक्षिण टोक यांना जोडणारी रेषा होय. जेव्हा तुमची बोटे अक्षवृत्तांच्या मध्यभागी येतात, तिथे तुम्हाला या संपूर्ण विश्वाला क्षितीज पातळीवर वेढून घेतलेली एक रेषा मिळते तिला विषुववृत्त म्हणतात. यामुळे विश्वाचे दोन समान भाग होतात. उत्तर ध्रुव व दक्षिण ध्रुव होय. विषुववृत्ताला शून्य अंशाचे अक्षवृत्त असेही म्हणतात. आपण विश्वावर अक्षवृत्ताच्या इतर रेषा अनुभवल्या असतील ना? त्या विषुववृत्तापासून उत्तर/दक्षिण ध्रुवाच्या किती लांब असतात हे सांगतात. विद्यार्थी विश्वाचे काळजीपूर्वक निरीक्षण करतील व आपली मते मांडतील. अक्षवृत्ताच्या सर्व रेषा विषुववृत्तापेक्षा लहान असतात. ध्रुवाजवळ $90^0$ उत्तर व $90^0$ दक्षिण हे एका बिंदूने दर्शविले जातात. त्यामुळे ते परस्परांना स्पर्श करीत नाहीत. अक्षवृत्ताच्या सर्व रेषा विषुववृत्ताला समांतर असतात. कर्क व मकर वृत्तावर विविध ठिकाणी विद्यार्थी आपली बोटे फिरवतील व ज्यांतून ही वृत्ते जातात त्या देशांची नावे सांगतील.

**कृती 2 :**

- विषुववृत्ताच्या दक्षिण व उत्तर ध्रुवावर असणाऱ्या ठिकाणाची नावे सांगा.
- नकाशावरून अक्षवृत्ताच्या आधारे ठिकाणे ठरविणे.

**रेखांश/रेखावृत्ते :**

शिक्षक विद्यार्थ्यांना निरीक्षण करण्यासाठी प्रेरित करतील की, दक्षिण उत्तर दिशेने समांतर रेषांचे निरीक्षण करून त्या रेषा दक्षिण ध्रुव व उत्तर ध्रुव येथे एकत्रित येतात. अशा एकत्रित येणाऱ्या रेषांना रेखावृत्ते असे म्हणतात.



*Fig. 3: Location of places in grids on the Globe and on Black board (2D)*

दोन रेखावृत्तांतील लांबी दोऱ्याने मोजायला सांगा. रेखावृत्ते व अक्षवृत्ते यातील अंतरातील फरक समजून घ्या. कोणते अंतर अधिक आहे?

या सर्व रेखावृत्तांची लांबी समान असते. या रेखावृत्तांना मूळ/शिखर रेषा असेही म्हणतत. एखादे ठिकाण निश्चित करण्यासाठी पूर्वेकडून व पश्चिमेकडून $0^0$ रेखाशांपासून किती अंतरावर आहे. हे मूळ रेखावृत्तापासून समजते. $180^0$ रेखावृत्त हे $0^0$ च्या अगदी विरुद्ध बाजूला असते. एकूण $360^0$ रेखावृत्ते असतात. या सर्व रेखावृत्तांची किंमत/संख्या $0^0$ च्या पासून किती अंतरावर आहे हे समजते. ही सर्व रेखावृत्ते ग्रीनीच रेषेला बिंदूत जातात. जी रेषा लंडन जवळ (इंग्लड मध्ये) आहे. एकूण सर्व 360 रेखावृत्ते आहेत.

**कृती 3 :**

- विश्वावरील दक्षिणोत्तर वृत्त शोधा आणि या ओळीवर रेखित केलेले स्थान ओळखा.
- $100^0$ रेखावृत्तावर एक ठिकाण ठरवावे. विद्यार्थी विचारतील की विश्वावरचे देशाचे स्थान कसे ठरवायचे.

सपाट पृष्ठभागावर तसेच विश्वावर कोठेही एखादे स्थान ठरविण्याची ग्रीड (जाळे/द्विमितीय जाळे नमुना) हे अत्यंत सोपे साधन आहे. विश्वावर आपण अक्षवृत्ते व रेखावृत्ते ही परस्परांशी $90^0$ अंशाच्या कोनात छेदतात असे अनुभवत आहोत. उपग्रहांवरील विविध स्थाने शोधण्यासाठी **NCERT** चे **'स्कूल भुवन' (School Bhuvan)** हे जिओ पोर्टल वापरावे.

**कृती 4 : विश्वातील खालील ठिकाणे दिलेल्या स्थानानुसार निश्चित करा.**

- $30^0$ उत्तर अक्षवृत्त, $90^0$ पश्चिम रेखावृत्त –
- $60^0$ उत्तर अक्षवृत्त, $15^0$ पूर्व रेखावृत्त –

**यापैकी खालची कृती ही समवयस्क गटासाठी योग्य ठरेल.**

**कृती 5 : दिलेल्या अक्षवृत्त व रेखावृत्ताच्या माहितीवरून भारताच्या नकाशात विविध राज्ये निश्चित करा.**

**साहित्य :** भारताचा नकाशा इयत्ता सहावी पृष्ठ क्र. 49. शिक्षक (Bhuvan) भुवनचा उपयोग करून भारताच्या शेजारच्या देशांचे नकाशे दाखवतील. Bhuvan हे ISRO (Indian Space Research Organisation) भारतीय अवकाश विज्ञान संशोधन संस्थेने विकसित केलेले मोबाईल ॲप्लिकेशन (उपयोजन) आहे.




Figure 7.2 : Political map of India
*Telangana became 29th state of India in June 2014

### खालील अक्षवृत्ते व रेखावृत्ते यांच्या आधारे राज्ये निश्चित करावी.

- $15^0$ उत्तर अक्षवृत्त, $80^0$ पूर्व रेखावृत्त –
- $24^0$ उत्तर अक्षवृत्त, $72^0$ पूर्व रेखावृत्त –

विद्यार्थी एकमेकांच्या शीट्सची अदलाबदल करून त्यांचे मूल्यमापन करतात.

| | **स्थान (Rank)** |
|---|---|
| डिग्री वाचणे | 1. अक्षांश<br>2. रेखांश<br>3. अक्षांश व रेखांश दोन्ही |
| पृथ्वी गोलावरील अक्षांश व रेखांश ओळखणे. | 1. कर्कवृत्त<br>2. कर्कवृत्त, $80^0$ उत्तर रेखांश<br>3. कर्कवृत्त, $80^0$ उत्तर<br>रेखावृत्त, कर्कवृत्तावरील स्थान |
| स्थान | 1. $15^0$ उत्तर अक्षांश $80^0$ पूर्व रेखांश<br>2. $24^0$ उत्तर रेखांश, $72^0$ पूर्व अक्षांश<br>3. 1 ते 2 चे अचूक उत्तर देतो. |

विद्यार्थ्यांची प्रगती तपासण्यासाठी त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची नोंद संचयिकेमध्ये शिक्षक घेऊ शकतात.


### रुब्रिक्ससाठी मूल्यांकन

| मूल्यांकन | सहाय्याची गरज आहे. | चांगले करण्याची गरज आहे. | इतरांना सहाय्य व मार्गदर्शन करू शकतो. |
|---|---|---|---|
| पृथ्वीगोल, अक्षांश, रेखांश व संबंधित संज्ञा ओळखणे. | संज्ञांची नावे पुन्हा आठवत नाहीत. | संज्ञांची नावे सहजपणे आठवतो. | ॲटलास व इतर नकाशातील संबंधित संज्ञांची नावे पुन्हा आठवतो. |
| अक्षांश व रेखांश यांचा उपयोग तयार करतो. | अक्षांश व रेखांशाची डिग्री बनवू शकत नाही. | अक्षांश व रेखांशाची डिग्री वाचतो. परंतु दिशाशी संबंध जोडू शकत नाही. | अक्षांश व रेखांश दिशा, अक्षांश व रेखांशाचे महत्त्व, मूळ रेखावृत्त इ. वाचतो. |
| उपयोजन पृथ्वीगोलावरती अक्षांश व रेखांश यांच्या साहाय्याने स्थान दाखवितो. | अक्षांश व रेखांश यांच्या संदर्भाने स्थान दाखवू शकत नाही. | अक्षांश व रेखांश यांच्या संदर्भाने स्थान दाखविण्यास वाचन येते. | सहजपणे (a) घ्यावे तसेच अक्षांश व रेखांश व रेखांशावरील इतर स्थान दाखवितो. |
| गटातील सर्व सदस्यांप्रती सहकार्य, सक्रीय सहभाग व तद्नुभूती. | सहभाग घेत नाही. | गटातील काही सदस्यांशी आंतरक्रिया करतो. | गटातील इतर सदस्यांना मदत करतो. तसेच आंतरक्रिया करतो व पुढाकार घेतो. |

## इतिहास

## स्रोत :

### परिचय




सामाजिक शास्त्राचे क्षेत्र स्रोतांच्या भांडारांनी भरलेले आहे. त्यामुळे शिकणारे विविध विषय खोलवर समजून घेतात. स्रोत प्रामुख्याने प्राथमिक व दवितीयक आहेत. जे निसर्गाशी संबंधित विविध समस्यांच्या पद्धतीबद्दल आणि त्यांच्याशी संबंधित व्यक्ती आणि समाज यांच्याशी संबंधित माहिती मिळविण्यास व शिकण्यास मदत करतात. असे म्हटले जाते परंतु त्यांना त्या विषयानुसार ओळखणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना या विषयाचे समग्र दृष्टिकोन प्राप्त होईल. आपण प्रत्येक स्रोतांचे समीक्षात्मक अन्वेषण करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे. जेणेकरून ते त्यांच्या स्वत:च्या निष्कर्षापर्यंत पोहोचू शकतील आणि त्यांना मदत करून आपणास पूर्वीच्या काळात घडलेल्या विविध घटना शोधण्याचा त्यांचा प्रवास सुरू करता येईल. ज्यायोगे तो कृती कार्यक्रम आणि कृती कार्यक्रमाच्या कार्याचे परिणाम यांच्यामधील फरक मनोरंजक मार्गाने समजू शकेल. तो विषय, वेळ आणि संस्था त्यांचे सातत्य तसेच बदलाच्या घटनांमध्ये एक धागा जोडू शकेल असे समजून घेण्यास प्रेरणा मिळते.

## शैक्षणिक प्रक्रिया :

स्रोतांविषयी चर्चा करून आपण वर्ग, शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या जीवनाशी जोडलेले बनवू शकता आणि ते आनंदी, उत्साहवर्धक बनवू शकता. आपण सतत मुलांशी बोलू शकता. आपण सतत मुलांचे गट पाडून किंवा सहाध्यायी जोडीने कृती सुरू करू शकता. जेणेकरून मुलांना स्रोतांबद्दल अधिकाधिक वाचन करण्यास प्रवृत्त करावे, स्रोतावर चांगल्या पद्धतीने चर्चा करावी, त्याचे स्वत:चे स्पष्टीकरण उभे करावे, प्रश्न तयार करावे आणि माहिती स्पष्ट करावी. आपण मुलांना संग्रहालय, पुरातत्त्व स्थळांना दाखवू शकता. आपण सतत मुलांचे गट पाडून किंवा सहाध्याची जोडीने कृती सुरु करू शकता. जेणेकरुन मुलांना स्रोतांबद्दल अधिकाधिक वाचन करण्यास प्रवृत्त करावे, स्रोतावर चांगल्या पद्धतीने चर्चा करावी, त्याचे स्वतःचे स्पष्टीकरण उभे करावे, प्रश्न तयार करावे आणि माहिती स्पष्ट करावी. आपण मुलांना संग्रहालय, पुरातत्त्व स्थळांना दाखवू शकता. तसेच कुटुंब, शेजार किंवा समाजातला परिचित व प्रसिद्ध व्यक्तींची मुलाखत देखील घेऊ शकता. यामध्ये आपण भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आणि विशेषतः भारताच्या विभाजनाशी संबंधित माहिती मिळविण्यास प्रयत्न अशा पद्धतीने करता येईल. कृती कार्यक्रम आयोजित करताना आपण विशेष गरजा असणाऱ्या मुलांना देखील समावेश करून घेता येईल. यांच्यासाठी आपण नक्षीदार नकाशे, आलेख, बोलकी पुस्तके, दृकश्राव्य, साहित्य, ब्रेल मधील साहित्य वापर करू शकता.


### अध्ययन निष्पत्ती

- आपला देश विश्वावर कोठे आहे?
- विविध ऐतिहासिक आणि पुरातत्त्व स्रोत ओळखतो.
- आपल्या भाषेत स्रोतांची व्याख्या करतो.
- उद्योगात आणलेल्या स्रोतांचे मूल्यमापन करतो.
- गोष्टी समग्र पद्धतीने साध्य करण्यासाठी विविध स्रोतांचे महत्त्व ओळखतो.

## स्रोतांचे प्रकार :

**साहित्यिक स्रोत** – कल्पना आणि माहिती लिहिण्यासाठी कागदाच्या वापरापूर्वी लोक भोज पत्रात किंवा पामचे पाने वापरत असत. असे सांगून तुम्ही साहित्यिक स्रोतांशी चर्चा सुरू करू शकता. आपल्या ऐतिहासिक भूतकाळात घडलेल्या बऱ्याच घटनाबद्दल

अनेक लेखी पुरावे हस्तलिखितामध्ये वर्णन केले आहेत. की जी मंदिरे, मठ, संग्रहालये आणि काही कुटुंबात त्याचे खाजगी संग्रह म्हणून उपलब्ध आहे ते मुख्यत्वे धार्मिक श्रद्धा, राजांचे जीवन, प्रशासकीय बाबी शिक्षण आणि इतर अनेक गोष्टीबद्दल लिहितात. ते संस्कृत, प्राकृत, तमिळ आणि इतर प्रादेशिक भाषांमध्ये लिहिलेले होते.



**वैयक्तिक किंवा गटामधील कृती**

*आपण हस्तलिखित पाहिले आहे का?*

*तुम्हांला ते कोठे पहावयास मिळाले?*

*त्यामध्ये कोणती सामग्री वापरली जाते?*

*लेखनासाठी वापरल्या जाणाऱ्या इतर साहित्यांचा उल्लेख करा.*

*आपण आता आपले विचार लिहिण्यासाठी कोणती सामग्री वापरत आहात?*

*लेखनासाठी वापरल्या जाणाऱ्या सामग्रीमधील बदलांची कारणे दर्शविणारी एखादी घटना तयार करा.*

जेव्हा मनुष्याला धातूबद्दल कळले तेव्हा हळूहळू त्याच्यावर तांबे, कासे, इत्यादी आणि नंतर कागदावर वेगवेगळ्या प्रकारच्या साहित्याकृती लिहिल्या गेल्या. हे साहित्यिक काम विविध प्रकारचे होते. ते धार्मिक विषयांशी संबधित होते. प्रशासकीय कागदपत्रे शैक्षणिक आणि इतर विविध विषयांशी संबंधित होती आणि वेगवेगळ्या कालावधीत लिहिलेली असत. लिखित मजकूर विविध भाषांमध्ये होता आणि त्यांच्या साहित्य शैलीतील विविध प्रकारांचा अवलंब केला गेला. यापैकी काही गद्य, कविता, कथा, संवाद, इत्यादीच्या रूपात होती. त्यापैकी काही तुम्ही मुलांना सांगितलीच पाहिजे. आपली काही प्रसिद्ध कायद्याची धर्मसूत्र व स्मृती सारखी पुस्तके प्रसिद्ध आहेत. या प्रसिद्ध पुस्तकामध्ये राजाचे, प्रशासकाचे व लोकांचे कर्तव्य लिखित आहेत. यामध्ये मालमत्तेच्या बाबतीत तपशील दिलेला आहे. दिवानी अथवा फौजदारी गुन्हा निश्चित करताना ही या पुस्तकांतील बाबींचा विचार केला जातो. कौटिल्य यांची अर्थशास्त्र ही प्रशासनाच्या क्षेत्रातील एक प्रसिद्ध काम मानले जाते. त्याचप्रमाणे वैद्यकिय क्षेत्रात आपण चरकांनी लिहिलेली चरक संहिता आणि सुश्रूतच्या सुश्रूतसंहितांचे उदाहरण देऊ शकता. ज्यामध्ये विस्तारित शल्य चिकीत्सा, वैद्यकीय पद्धती अधोरेखित केल्या आहेत. ही उदाहरणे अधिग्रहित केलेल्या विषयाच्या आवश्यकतेनुसार एकत्र केली जाऊ शकतात. शिकवण्याच्या व शिकण्याच्या प्रक्रियेत आपण पुस्तकातील मजकुरातील कोणत्याही विषयावर चर्चा करु शकता. आणि ते शोधण्याचा प्रयत्न करू शकता. हे अस्तित्वात असलेल्या काही ग्रंथात नमूद केले आहे की नाही याचा शोध घेण्याचा आपण प्रयत्न करू शकता. पुरुष आणि स्त्रिया यांनी लिहिलेल्या साहित्यिक स्रोतांना देखील जोडू शकता. भक्ती चळवळीबद्दल शिकवताना स्त्रियांनी रचलेली साहित्यकृतीचा उल्लेख केला जाऊ शकतो. त्यामध्ये अदल सारख्या भारतातील संत कवियित्रीच्या रचनांचा समावेश जाऊ शकतो. त्यांनी थिरुप्पवई

आणि नचियार थिरुमोझी हे काव्य लिहिले आहे. त्यांच्या या दोन्ही रचना तमिळ भाषेत आहेत आणि मुक्ती मिळवण्याचे साधन म्हणून भक्तीवर केंद्रित आहे. त्याच प्रमाणे संत मीराबाईंचा कार्यकाळ भक्तीवर केंद्रित आहे. या दोन्ही कार्यामध्ये ते राहत असलेल्या समाजाचे वर्णन करतात. संत कवींच्या कार्यामुळे लोकभाषा आणि साहित्य समृद्ध होते आणि आपली कला आणि संस्कृती मजबूत होण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले जाते. उत्तर व दक्षिण भारतातील बरीच मंदिरे महिला संताना समर्पित आहेत. संत पुरुष व स्त्रियांनी वापरलेली वाद्ये आजही प्रत्येक सामुदायिक गायनात लोकप्रिय आहेत.

महिलांच्या काही महत्त्वपूर्ण रचना आहेत जशा–तमिल महाकाव्य सिलप्पादिकारम मध्ये उल्लेख सापडतो. तसेच उपनिषदामध्येही महान दर्शन ग्रंथामध्ये गार्गी या महिलांसाठी विचार कार्य करणाऱ्या स्त्रीचा उल्लेख सापडतो. गार्गी एक विद्वान महिला होती. ती राज दरबारामध्ये दार्शनिक वादविवाद व चर्चासत्रामध्ये भाग होत होती. साहित्यिक रचनामध्ये राजाच्या जीवन चरित्रावर लेखन सापडते की जे लेखक राजाच्या दरबारातील इतिहासकार होते. बाणभट्ट ने हर्षचरित्र लिहिले, बिल्हण ने विक्रमादित्य विषयी लिहिले आणि कल्हण यांनी राजतरंगिणीमध्ये काश्मिरच्या इतिहासाचा लेखा जोखा मांडला आहे. चंदबरदाई याने पृथ्वीराज यांचे चरित्र लिहिले आहे. प्राचीन भारताच्या साम्राज्यांच्या चर्चा करताना यामध्ये आपण अधिकचे खूप काही जोडू शकता. आपण शिकणाऱ्यांना हे देखील सांगू शकता की भूतकाळातील एक संपूर्ण चित्र मिळविण्यासाठी पुरातत्व पुरावा यासारख्या इतर स्रोतांसह साहित्यिक कृती वापरल्या पाहिजेत.

### मिश्र गट पद्धती मधील कृती/प्रकल्प

| अ.क्र. | लेखक | पाठ | काळ व संबंधित व्यक्ती |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**भारतीय उपखंडावर वेळोवेळी प्रवास करणाऱ्यांचा इतिहास** – वेळोवेळी बरेच लोक भारतीय उपखंडात यात्रा करण्यासाठी आलेले आहेत. त्यांच्या सर्व प्रवासाची उद्दिष्टे वेगवेगळी होती. काही लोक यात्रेकरू म्हणून आले होते आणि काहींना तक्षशिला आणि नालंदा यासारख्या नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घ्यायचा होता. बौद्ध धर्माबद्दल अधिक शोध घेण्यासाठी बौद्ध यात्रेकरू म्हणून आलेल्यांनी लेखांमधील त्यांच्या लेखनाचा तपशील सांगितला आहे. आपल्या देशात आलेल्या सर्व प्रवाशांनी आपली संस्कृती, वारसा, शैक्षणिक प्रणाली, धर्म, समाज आणि येथील राजकर्त्यांविषयी मौल्यवान भूतकाळाबद्दल जाणून घेण्यासाठी त्याने जे लिहिले ते एक उत्तम माध्यम आणि स्रोत आहे. शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या प्रक्रियेत आपण हे देखील सांगू शकता की प्रवाशांच्या तपशीलांचा वापर. इतर स्रोतांशी देखील केले पाहिजे कारण त्यांना समाजाच्या घटना आणि त्याच्या दृष्टिकोनातून त्यांची आवड समजली आहे आणि म्हणूनच एखाद्या व्यक्तीचे घटक त्यांची तपासणी करतात. त्यांनी लिहिलेला तपशील हा अभ्यासाचा मुख्य व प्रामाणिक आधार होऊ शकत नाही. की ज्याच्या आधारावर निष्कर्षापर्यंत आपण जाऊ शकू. आपण ग्रीक राजदूत मेगास्थेनिसचे उदाहरण देऊ शकता. जे चंद्रगुप्त मौर्यांच्या दरबारात वास्तव्य करीत होते आणि त्यांनी आपले प्रसिद्ध इंडिका पुस्तक लिहिले होते. जरी ते पुस्तक हरवले असले तरी ते आणि ग्रीक लेखकांच्या लेखनात सापडले आहे. या पुस्तकात मौर्य काळाबद्दल प्रकाश पडतो आणि अलेक्झांडरच्या आक्रमणाचा उल्लेख आहे. बरेच चिनी यात्रेकरू देखील आपल्या देशात आले. 1600 वर्षांपूर्वी गुप्त काळात फाहियान भारतात आले होते. तसेच हवेनत्सांग यांनी राजा हर्षच्या दरबारामध्ये बराच कालावधी घालविला. त्यांनी बऱ्याच संस्कृत काव्यांचे चीनी भाषेत भाषांतर केले. त्यांनी नालंदा विद्यापीठात शिक्षण घेतले आणि आपल्या अनुभवांबद्दल लिहिले नंतर भारतात आलेले दुसरे प्रवासी ते होते अल बरुनी. त्याचे प्रसिद्ध पुस्तक किताब–उल–हिंद आहे. जामध्ये लोक व समाज यावर खूप उपयोगी माहिती दिलेली आहे. ज्या विषयावर चर्चा चाललेली आहे त्यानुसार आपण अनेक उदाहरण देऊ शकता. आपण मुलांना नकाशावरून मार्ग दाखवू शकता की यात्रेकरूंनी प्रवास कसा केला व ते कोणकोणत्या महत्त्वपूर्ण स्थळांना त्यांनी भेटी दिल्या.

**जोड्या आणि गटांमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या कृती**

| वेगवेगळ्या उद्देशाने भारतीय उपखंडास भेट देणाऱ्या व्यक्ती | भेटीचा कालखंड | विवरण | विशिष्ट अधोरेखित केलेले पैलू |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

## मुद्राशास्त्र

मुद्राशास्त्र म्हणजे कागदी नोट्स आणि अशा कणांचा अभ्यास हे अर्थव्यवस्थेची स्थिती आणि लोकांच्या हितावर प्रकाश टाकते. मोठ्या प्रमाणात चलन म्हणून मौल्यवान नाण्यांचा सराव दर्शवितो की आर्थिक परिस्थिती मजबूत आहे. आमच्या ऐतिहासिक भूतकाळात जी नाणी वापरली गेली ती सोने, चांदी, तांबे आणि शिसे अशा मौल्यवान धातूंची बनलेली होती आणि नंतर कागदी चलन म्हणून नोटा वापरायला सुरुवात झाली. सुरुवातीच्या काळात वापरली जाणारी नाणी ही खराब (पंचमार्क वापरून) होती जी आयताकार किंवा कधी कधी गोलाकार सुद्धा होती. नंतर बहुतांश नाणी सत्ताधारी घराण्याद्वारे जारी करण्यात आली आणि म्हणूनच त्यांच्यावर बऱ्याच राज्यकर्त्यांची कोरलेली नावे होती. विद्यार्थ्यांसोबत भाषण काही माहिती सामाजिक करून मनोरंजनात्मक माहिती देऊ शकतो.



An Indo-Greek coin


A Kushana coin


Punch marked coin


A Satavahana coin


A Shaka coin


Silver coin bearing the name of Queen Nur Jahan

Our Pasts –I: textbook in history for class VI, (2017), NCERT, pp. 86, 92

Our Pasts –II: textbook in history for class VII, (2019), NCERT, p. 54

उदा. तुम्ही जहांगीराचे उदाहरण देऊ शकता. त्याने चांदीच्या नाण्यावर एका बाजूला स्वतःचे नाव व दुसऱ्या बाजूला रानी नूरजहाँ हिचे नाव लिहून नाणे तयार केले होते.

काही नाणी ही धार्मिक आणि पुराणाची प्रतिके होती. आपण पुढील कृती देऊन विषय पुढे नेऊ शकतो.

### गटात जोडीने करावयाची कृती

वर्तमान स्थितीत उपयोग केली जाणारी नाणी मुलांना दाखविणे यानंतर आपण

1) जे लिहिले आहे ते वाचायला सांगणे.

2) कोणत्या प्रतिकांचा उपयोग केला आहे ते सांगण्यासाठी सांगू शकता?

3) त्यांना विचारू शकता की कोणती दृश्ये आहेत जी खास करून दाखविली आहेत?

4) कोणत्या धातूपासून नाणी बनवली आहेत?

5) स्मारक नाणी म्हणजे काय?

**शिलालेख :**

शिलालेखांच्या अभ्यासाला संपूर्ण मजकूर विद्या म्हटले जाते. प्राचीन शिलालेख, भिंती, स्तंभ दगडीपट्ट्या, इमारतीच्या भिंती, स्मारक आणि मंदीरातच वर लिहिलेले होते. हे शिलालेख विविध संदेशांचे स्मरण करतात. सम्राट अशोकाच्या काळापासून आपण शिलालेखांची उदाहरणे देऊ शकता. जे देशांच्या विविध भागात आढळतात. अशोकाच्या काळातील बहुतेक शिलालेख प्राकृत भाषेत आणि ब्राह्मी लिपीमध्ये लिहिलेले होते. आपण त्यात भर घालून माहिती सांगू शकतात. त्यांचा एक शिलालेख खरोष्टी मध्ये लिहिलेला होता. हे ग्रीक आणि अमेरिकी लिपीमध्ये लिहलेले शिलालेख कंधा आणि अफगाणिस्तानमध्ये सापडले. आपण हा मजकूर पाठ्यपुस्तकांचा इतर स्रोतांवरील चित्रे आणि दृश्य स्वरूपात इ साधनांचा वापर करून दाखवू शकता.

अशा प्रकारे आपण भूतकाळ त्याच्या विविध ऐतिहासिक वैशिष्ट्यांविषयी आणि आपल्या सांस्कृतिक वारश्याच्या समृद्ध खजिन्यांविषयी जाणून घेण्याचे महत्त्वपूर्ण साधन आहे. ज्या विषयांची संशोधन चालू आहे. यामध्ये शिल्पाकृती, वस्तू आणि इमारती (वास्तू) यासारख्या पुरातात्विक अवशेषांची जादा माहितीचा समावेश करू शकता. तुम्ही मुलांना आदिमानव स्तूप, चित्र आदि गोष्टीचे अवशेष दाखवू शकता. या संशोधनांच्या विषयावर चर्चा करू शकता आणि त्यांना माहिती सांगू शकता.

तुम्ही मुलांना आपले विचार आणि आपली भाषा याद्वारे लिहिण्यासाठी प्रेरित करून प्रोत्साहित करून काही कृती देऊ शकतात.

1. प्रोजेक्टसाठी विषय निवडणे.
2. जे स्रोत हवे आहेत ते शोधा, पहा आणि परिसरातील त्यांची उपलब्धता.
3. हे स्रोतांची वर्गवारी करून त्यासाठीचा खास कालावधी किती लागू शकेल याचा उल्लेख करा.
4. तुम्ही तुमच्या आसपास, शेजारी, समुदायामध्ये 'भारत छोडो' आंदोलनात सहभागी व्यक्ती किंवा भारत विभाजनाच्या वेळी साक्षीदार असणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्याकडून माहिती एकत्र करा.

संसाधनाचा, स्रोतांचा वापर करून तुम्ही तुमच्या इयत्तेमध्ये कशा प्रकारे शिकविता किंवा कशाप्रकारे अभ्यास करून घेता हे एक रोचक आणि सहभागाचे उदाहरण होईल. आपल्याला प्रत्येक क्रियाकलापानंतर प्रश्न विचारून सतत संवाद कायम ठेवावा लागेल. जरूरीनुसार त्यांना आपण शंका विचारणे किंवा माहिती देण्यासाठी प्रोत्साहित करा. तुम्ही अशा लोकांची पण माहिती मिळवा की त्यांना या कोणत्याच बाबींमध्ये रस नाही. ते सतत इतरांची अवहेलना करतात किंवा इतर इयत्तेच्या मुलांना त्रासदायक आहेत. अशा मुलांना मिश्र समूह बनवून एकमेकांच्या मदतीने शिकण्यासाठी प्रोत्साहित करा. मानसिक दृश्य, सामग्री, मॉडेल इत्यादींचा वापर करून शिक्षण सुकर होण्यासाठी मार्गदर्शन करा आणि विचार करायला भाग पाडा. याद्वारे विद्यार्थ्यांना सर्व स्रोत समजतील आणि आपली ऐतिहासिक माहिती व त्याचे स्रोत यांविषयी माहिती मिळण्यास व समजण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांना याचे मूल्यांकन करण्याची

प्रोजेक्ट, कृती, उपक्रम, निबंध, लघुत्तरी प्रश्नांचा वापर पण केला जाऊ शकतो. यासाठी विद्यार्थ्यांची बोली भाषा वापरण्याची मुभा दिल्यास त्यांना प्रोत्साहन मिळेल.

## संकल्पना : उपजिविका

### परिचय

भारतातील ग्रामीण आणि शहरी भागात लोक विविध प्रकारच्या उपजिविका मिळवितात. लोकांना रोजीरोटी मिळविण्याच्या संधी प्रत्येकासाठी सारख्याच नसतात. त्या वेगवेगळ्या असतात. संधी अनेक घटकावंर अवलंबून असतात. त्यांचे कार्य भिन्न असू शकत नाही किंवा एखाद्या विशिष्ट प्रदेशाची संस्कृती याप्रमाणे असते. काही लोक अशी काम करीत आहेत जे त्यांना शक्यतो वर्षभर उत्पन्न मिळविण्याची संधी देतात. उदा. काही लोक लघुउद्योगात आणि अर्थव्यवस्थेच्या रोजगार निर्मिती क्षेत्रात काम करणारे आहेत. जे वर्षाच्या काही काळासाठीच काम करतात, जसे की – पेरणी, खुरपणी व पूर्व लावणी यासारख्या शेतीशी संबंधित उपक्रम – वेगवेगळ्या नोकऱ्या, वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या आणि आव्हानांना सामोरे जाऊ शकतात जी व्यक्तींच्या समूहासाठी वेगळ्या असतात.

### शिकत आहे –

- शहरी आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या उत्पन्नाची साधने जाणून घेणे.
- रोजीरोटी मिळविण्यासाठी लोकांना काय संधी उपलब्ध आहेत किंवा नाही?
- लोकांच्या जीवनातील परिस्थिती आणि आव्हानांमधील भिन्नता आणि समानता यांचे वर्णन करा.

### सुचविलेल्या शैक्षणिक प्रक्रिया :

उपजिविका या विषयाद्वारे पुरुष व महिला ग्रामीण व शहरी भागातील विविध उपजिविकेच्या उपलब्धतेसाठी जबाबदार घटकांचे वर्णन करणे आणि मुलांना समजावून सांगणे अपेक्षित आहे. आपण मिश्र गटात मुलांना समाविष्ट करू शकता आणि त्यांच्या जिल्हा आणि खेड्यांमध्ये रोजगाराच्या विविध स्रोताविषयी चर्चा करू शकता. आपण आजही खेड्यांशी संबंधित समस्या आणि आव्हानांचा उल्लेख करून त्यांना विविध प्रकारचे बनविण्यासाठी प्रवृत्त करू शकता. एखाद्या व्यक्तीने विविध सामाजिक–आर्थिक पार्श्वभूमीवरील पुरुष आणि स्त्रिया यांच्या विविध व्यवसायांवर ऑडिओ–व्हिज्युअल सामग्रीचा अभ्यास करण्याची अपेक्षा केली जाऊ शकते आणि मुले त्यांच्याबद्दल काय विचार करतात हे जाणून घेण्यासाठी चर्चा आयोजित केली जाऊ शकते. आपण पुरुष व स्त्रियांद्वारे केलेल्या विविध प्रकारच्या कृषी उपक्रमांची मुलांना ओळख करून देण्यासाठी त्यांना जवळच्या शेतात देखील घेऊन जाऊ शकता. जर तुमची शाळा शहरी भागात असेल तर विद्यार्थ्यांना बांधकाम साईट्स, कारखाने, कार्यालये किंवा बाजारपेठेत घेऊन जाऊ शकता.

उपरोक्त सहभागात्मक पद्धती व्यतिरिक्त, सर्वेक्षण पद्धती आणि विविध व्यवसायावर नवीन अभिनयात्मक कृती कार्यक्रम देखील केली जाऊ शकते. शाळांमध्ये मेळावे आयोजित केले जाऊ शकतात. या विषयाचे स्पष्टीकरण देताना, ग्रामीण आणि शहरी भागात विविध उत्पादने दर्शविण्यासाठी विचार केला जाऊ शकतो.

### मिश्र गटासोबतचे उपक्रम :

अध्यापनशास्त्र म्हणून क्रिया उपक्रम चर्चेची मालिका वापरली जाऊ शकते. सुरुवातीच्या काळात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात चर्चेद्वारे रोजीरोटीची संकल्पना मांडली जाऊ शकते. उदा. संभाषणे, विद्यार्थ्यांच्या पालकांबद्दल, त्यांच्या कार्याबद्दल, सुवर्ण व्यावसायिकांचे कार्य संबंधित क्रिया यांसारखे ते त्यांच्या कमाईचे काय करतात? उत्पन्न कसे इ. विषयावर चर्चा आणि इतर उपक्रमांद्वारे शिक्षक विद्यार्थ्यांना समजावून सांगू शकतात की आज रोजीरोटी हा एक अभिनव मार्ग आहे. ज्याद्वारे लोक जेवणाची आणि कपडे घालण्याची प्रतिक्षा करण्यासाठी पैसे कमावतात. याचा अर्थ असा की आज येथे होत असलेल्या कोणत्याही चर्चेत विविध व्यवसाय किंवा नोकरीचे वर्णन असेल ज्यात लोक जीवनाच्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी गुंतलेल्या आहेत. विद्यार्थ्यांना विविध व्यवसाय समजून घेण्यासाठी तीन उपक्रम करण्यास सांगितले आहेत.

1. शिक्षक आणि पुस्तकांमध्ये प्रथम उपलब्ध असलेली प्रिंट किंवा हाताने बनविलेले दृक् साधने समाविष्ट करा.
2. मुलांना वेगवेगळ्या विषयांमध्ये गुंतलेल्या लोकांची चित्रे काढण्यास प्रोत्साहित केले जाऊ शकते.
3. मुलांना काही प्रश्न विचारून लहान सर्वेक्षण करण्यास मार्गदर्शन केले जाऊ शकते.

## कृती 1

शिक्षक धड्यात दिलेली छायाचित्रे कोलाज पद्धतीने एकत्रित करू शकतात आणि विविध व्यवसायांतील व्यक्तींची छायाचित्रे घेऊन ती विद्यार्थ्यांना दर्शवू शकतात. विद्यार्थ्यांना हे समजणे सोपे करण्यासाठी आपण ब्लॅक बोर्डचा वापर करू शकतो. याच्या आधारे शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांद्वारे पुढील गोष्टी करता येतील.

1. लोकांना चित्र किंवा व्हिडिओअंतर्गत विविध उपक्रम कृतीमध्ये काम करताना दर्शविले जाते. त्याबद्दल लिहा.
2. शेती संबंधित कामे कोणती आहेत किंवा नाहीत?
3. आपण शाळा किंवा घराशेजारी भिन्न भिन्न व्यवसाय पाहू शकता त्यांना वेगवेगळ्या भाषा आणि वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते याची माहिती मिळवा.

| शेतीविषयी कामे | शेतीविरहित कामे | स्त्री/पुरुष | ग्रामीण शहरी | समान/असमान |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वरील कृती/उपक्रम विद्यार्थ्यांना वर्गीकरण, लेखन आणि संप्रेषण यासारख्या भिन्न कौशल्यांचा विकास करून श्राव्य दृक्श्राव्य आणि व्हिडिओ यासारख्या विविध कौशल्यांचा विकास करण्यास मदत करेल. या कृती/उपक्रमाद्वारे विद्यार्थी भाषिक विविधता ओळखले आणि भाषा शिकले. जाणून घेण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. एकाच व्यवसायासाठी भिन्न भाषांमध्ये वेगवेगळी नावे असू शकतात. उदाहरणार्थ कामगार, कंत्राटदार, मेसन–मिस्त्री, वेटबिगार, पोर्टर मजूर, इत्यादी. शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांची नावे वेगवेगळ्या भाषांमध्ये सूचीबद्ध करण्यास आणि चार्ट पेपरवर लिहून वर्गात दर्शविण्यास मदत करतात. वेगळ्या मातृभाषा असणारे विद्यार्थी तक्त्याचा विस्तार करू शकतात. या ठिकाणी अभ्यास भाषेविषयी विविधतेबद्दल आदर वाढवू शकता. हे लक्षात घेतले जाऊ शकते की विविध मार्गांनी रोजीरोटीच्या संधींचे वर्गीकरण देखील केले जाऊ शकते. असे नाही की केवळ लोक वर उल्लेखलेली कामे करतात. लहान मुलांसाठी प्रथमच आम्ही विविध क्षेत्रातील लोकांच्या रोजगाराशी संबंधित तपशील देत आहोत. जर ते काही सोप्या पद्धतीने सादर केले गेले तर ते अधिक चांगले असेल.

त्यानंतर ग्रामीण भागातील लोकांच्या व्यवसायावर चर्चा घेऊ शकते जे सहसा शेतीशी संबंधित कामे पशुसंवर्धन आणि हस्तरेखाशास्त्र संबंधित असतात. शहरी भागातील लोक खरे तर मुख्यतः उद्योग, कारखाने आणि सरकारी नोकऱ्यांमधील बिगर शेतीविषयक नोकऱ्यांशी निगडित आहेत. पाठ्यपुस्तकानुसार सामाजिक आणि राजकीय जीवन हे पाठ दिलेले आहेत. जे पूर्ण देशामध्ये रोजगारा–विषयीची खरी माहिती दाखवू शकतात.

## कृती 2

विद्यार्थ्यांच्या जोड्या त्यांच्या वर्गातून बाहेर येतील. (जेणेकरून विशेष गरजा असलेले विद्यार्थी शाळेत आणि आसपास सामिल होतील) ते शाळेच्या बाहेरील चारही बाजूस पाहणी करतील, निरनिराळ्या व्यवस्थांमध्ये गुंतलेल्या लोकांची छायाचित्रे तयार करतील आणि त्यांचा तपशील लिहितील ही छायाचित्रे वेगवेगळ्या श्रेणीवर प्रभागांतर्गत वर्ग सूचना फळ्यावर लावतील. ही क्रिया विद्यार्थ्यांना मूल्यांकन, वर्गीकरण आणि निरीक्षणाची कौशल्ये विकसित करण्यास मदत करू शकते.

शहरी भागातील, महानगरातील, ग्रामीण भागातील पाठ वाचणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्णपणे समजू शकले नाही आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या मुलांना कपड्यांची कल्पना करणेही अवघड आहे. कपड्यांची दुकान आणि बहुमजली शॉपिंग कॉम्पलेक्स म्हणजे काय? दोन्ही स्थितीत तुम्ही त्यांची मदत करून खरी परिस्थिती दाखवू शकता. वरील संदर्भाने मदत करणे याचा आणखी एक मार्ग म्हणजे आज काही व्हिडीओ आणि चित्रपट मुलांना दाखविले आहेत. ज्यात शेती, फिश मार्केट, शॉपिंग कॉम्प्लेक्स खरेदी आणि वस्तू विकतात किंवा वस्त्रोद्योग कसा चालतो? त्याबद्दल सांगितले जाते.

## कृती 3

मजकूर पुस्तकात वापरल्या जाणाऱ्या वर्णनाची तंत्र ज्यात व्यक्ती सक्रियपणे काम करत आहे हे शिकण्याच्या इतर मार्गांमध्ये जोडले जाऊ शकते जे यापूर्वी कार्य करेल म्हणजेच **सर्वेक्षण पद्धत किंवा मिनी नोटबुक आधारित सर्वेक्षण –**

विद्यार्थ्यांना विविध प्रकारची कामे करणाऱ्या लोकांना भेटण्यास सांगितले जाऊ शकते. बऱ्याच मुलांचे पालक एक तर काम करत असतील. त्यांच्या पालकांमध्ये मुलांच्या कामाचे स्वरूप काय आहे? त्याबद्दल माहिती संकलित करण्यासाठी मार्गदर्शन करू शकतात.

1. लिंग
2. व्यवसाय
3. कोणती कोणती कामे करता?
4. घरातून किती वाजता निघता आणि घरी किती वाजता पोहचता?
5. कामाच्या ठिकाणी कसे पोहचता.
6. तुम्हांला दिवसाला आठवड्याला किंवा महिन्याला किती पगार दिला जातो?
7. तुम्हांला नियमितपणे काम मिळते? कोणत्या महिन्यात नियमित काम मिळते? नियमितपणे काम का नसते?
8. कामातून मिळणारा पगार परिवारासाठी पुरेसा आहे का?

वरील प्रश्नांची उत्तरे जर 'नाही' असतील तर तो आणखी कोणत्या वैयक्तिक पातळीवर पैसे मिळवितो. (वरील यादीत आणखी प्रश्न समाविष्ट करू शकता). भिन्न प्रणालींमध्ये गुंतलेल्या लोकांना बऱ्याच समस्या आणि आव्हानांचा सामना करावा लागतो. या उपक्रमातून त्यांच्याशी चर्चा केली जाईल. सर्वेच्या आधारे, शिक्षक, विद्यार्थ्यांच्या विविध समस्या आणि आव्हाने यावर देखील चर्चा करू शकतात. शिक्षक त्यांच्या आयुष्यात सामोरे जाणाऱ्या लोकांचेही लक्ष वेधून घेऊ शकतात.

1. प्रशिक्षणार्थींना श्रमाची प्रतिष्ठा समजून घेण्यासाठी विशिष्ट व्यवसायातील कार्याचे महत्त्व आणि हेतू यावर.
2. कोणत्याही कार्याच्या क्रिया लिंगाच्या आधारावर विभागल्या जाऊ शकत नाहीत.
3. व्यवसायांची विविधता
4. त्यांच्या लक्षात आलेल्या विविध व्यवसायांमधील समानता आणि असमानता.
5. पुरुष आणि स्त्रियांना दिलेल्या श्रमाच्या फरकावर तीनही उपक्रमातून/कृतीतून विद्यार्थ्यांनी एकत्रित केलेल्या नोकरीच्या विवरण पत्रिकेत लिहिले जाते.

कृती पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे एकत्रीकरण खालील तक्त्यामध्ये लिहा.

| क्षेत्र | व्यवसायाचे नाव |
|---|---|
| **औद्योगिक वर्गीकरण**<br>1) कृषी आणि इतर<br>2) उद्योग<br>3) सेवा क्षेत्र | |
| **व्यावसायिक वर्गीकरण**<br>ग्रामीण क्षेत्र<br>1) शेतमजूर<br>2) शेतकरी<br>3) शेती नसलेली कामे<br>स्वयंरोजगार बिगर शेती<br>शेती नसलेल्या नोकरीत काम करणारे मजूर/श्रमिक | |
| **शहरी क्षेत्र**<br>1) स्वतः नियुक्त केलेले<br>2) नियमित पगार देणारी नोकरी.<br>3) अनियमित मजुरी करणारे मजूर | |

शिक्षक पुढील सामान्य मुद्द्यांवर आधारित चर्चा करून जागृती करू शकतात.

1. जर कोण लहान बालक मजुरी करत असेल तर त्यावर चर्चा करून आणि वर्गात बालमजुरी करणाऱ्या मुलांचे विचार समजून घेऊन त्यावर आधारित चर्चा करता येईल.
2. पुरुष सहसा कोणत्या प्रकारचे कार्य करतात आणि स्त्रिया कोणत्या प्रकारचे कार्य करतात यावर चर्चा केली जाऊ शकते.
3. काही शेतकऱ्यांकडे जास्त जमीन का आहे? बऱ्याच लोकांकडे केवळ थोड्या प्रमाणात जमीन का आहे? काही लोकांच्या शहरी भागात स्वतःची घरे असून अनेकजण भाड्याच्या घरात राहतात. याबद्दलही शिक्षक प्रश्न निर्माण करू शकतात. काही कुटुंबांकडे बरीच मालमत्ता आहे तर काही कुटुंबामध्ये अल्प प्रमाणात मालमत्ता आहे. आम्हाला तपशीलात जाण्याची गरज नाही आम्ही मुलांना याकडे लक्ष देण्याची संधी देऊ शकतो.
4. शिक्षक विद्यार्थ्यांना काही दुकानांना भेट देण्यासाठी आणि तेथे विकल्या जाणाऱ्या सामानाचा तपशील आणि वेगवेगळ्या प्रकारच्या दुकानांमध्ये असलेल्या किंमतीची पातळी एकत्रित करण्यास सांगू शकतात. असे प्रश्न त्यांना विचारले जाऊ शकतात की काही लोक रस्त्यावर माल का पाठवतात आणि काही लोक दुकानांमध्ये माल का विक्री करीत आहेत. मुलांना जागोजागी स्थानांतरित केले असल्यास मुलांना किंवा त्यांच्या पालकांना कळविण्यास प्रोत्साहित केले जाऊ शकते. अखेर, त्यांनी एक जागा सोडून दुसऱ्या ठिकाणी का गेले त्यांचे आजोबा काय करतात आणि त्यांचे आजोबा कुठे राहतात. ती जागा सोडण्यात काही फायदा आहे का?

## प्रश्न आणि त्यांचा हेतू

उपजिविकेचा धडा शिकवल्यानंतर शिक्षकांना हे माहित असणे आवश्यक आहे की मुलांना व्यावसायिक वेतन लागू करणे आणि दोन बाजारातील जमीन, वस्तू, हवामान, कर्ज घ्यावे किंवा शेती द्यावी, शेती, फॅक्टरी द्यावी, कॉल सेंटर द्यावे लागेल. वाहतूक आणि स्थलांतर सारख्या संज्ञेचे आकलन झाले किंवा नाही त्यासाठी औपचारिक मूल्यांकन करू शकता.

विषय संपल्यानंतर आपल्याला बऱ्याच शिक्षण परतावा दिसतील जे घटकसंचामध्ये स्पष्टपणे निर्दिष्ट नाहीत. परंतु सहभागात्मक शिक्षणाद्वारे ते शिकणारे त्यांचे शब्द तोंडी आणि दृक्श्राव्य सामग्रीद्वारे बोलू शकतात. जेव्हा ते त्यांच्या शेजारच्या आणि समुदाय

सदस्यांशी त्यांच्या शाळेतील कृती कार्यक्रमांचा भाग म्हणून भेटतात आणि त्यांच्याशी बोलतात तेव्हा संवाद साधण्याचे कौशल्य देखील विकसित करतात.

### स्वतःच्या मूल्यांकनासाठी निकष

| मी हे करू शकतो | | चांगले | खूप छान | उत्कृष्ट |
|---|---|---|---|---|
| 1) घटकसंच आणि उदाहरणांचा उपयोग केला आणि जादाची माहिती दिली. | | | | |
| 2) सामाजिक शास्त्राच्या वेगवेगळ्या क्षेत्रांना एकमेकांसोबत जोडले. | | | | |
| 3) सांगितलेल्या आणि जादाच्या कृती केल्याबद्दल | | | | |
| 4) विद्यार्थ्यांनी स्वतःच्या भाषेत लिहिलेले म्हणून | | | | |
| 3) शैक्षणिक ऑडिओ/व्हिडीओ तयार केले म्हणून | | | | |

## संदर्भ


Learning Outcomes at the Elementary Stage. (2017).

NCERT, New DelhiManual for In-Service Education of Teachers and Teacher Educators of Social Sciences. Upper Primary and Secondary Stage. (2017-18).

Department of Education in Social Sciences, NCERT, New Delhi

Our Pasts – I : Textbook in History for Class VI, 2019. NCERT, New Delhi.

Our Pasts – II : Textbook in History for Class VII, 2019. NCERT, New Delhi.

Syllabus for Classes at the Elementary Level. National Curriculum Framework – 2005, Vol. I, 2006. NCERT, New Delhi.


Social and Political Life – I : Textbook for Class VI, 2019. NCERT, New Delhi.

The Earth Our Habitat. Geography Textbook for Class VI, 2019. NCERT, New Delhi.


### समकालीत नमुना – अभिरूप संसदेची क्रिया

1) सभापतींच्या उजवीकडे सत्ताधारी पक्षाचा गट
2) सभापतींच्या डावीकडे विरोधी पक्षाचा गट
3) महत्त्वपूर्ण नेत्यांसाठी सर्वात पुढे बसण्याची व्यवस्था. (सभागृहात त्यांच्या संख्येचा बळानुसार)
4) डावीकडे पहिली ओळ सभागृहात उप–सभापतीसाठी






### परिचय

संरचित किंवा कृत्रिम संसदेचे मंचन बहुधा सामाजिक विज्ञान शिकण्यात उपयुक्त ठरते. हे सामाजिक शास्त्राला वास्तविकतेची भावना देते. शिकणारे खासदार किंवा विधान सभेच्या सदस्यांची भूमिका बजावू शकतात. खासदार किंवा विधान सभेच्या सदस्यांची

भूमिका बजावू शकतात. अर्थात ते वेशभूषा वापरू शकत नाहीत, परंतु वर्गात बैठक व्यवस्था इत्यादी ते संसदेचा स्रोतानुसार करू शकतात. अशा खासदारांची तयारी म्हणून संसदेत उपस्थित असलेल्या विविध लोकांचे भाषण तयार करण्याची जबाबदारी शिक्षकांच्या गटावर सोपविली पाहिजे. वर्गाचा एक गट बनवून कोणता विद्यार्थी कोणती भूमिका करेल हे काम करण्यासाठी वापरावा. यानंतर संपूर्ण कृती आयोजित करण्यासाठी वर्गाचा आणखी एक तास वापरला जाऊ शकतो. संसद संपूर्ण आयोजन नाट्यानंतर अशा सत्राचे अधिवेशन घेण्यात येण्यापूर्वी काही प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आणखी एक तास वापरला जावा.

तरुण विद्यार्थ्यांना समकालीन विविध समस्या आणि समस्यांविषयी त्यांचे विचार व्यक्त करण्याची संधी देण्यासाठी शिक्षक वर्गात संसद आयोजित करू शकतात. शिकणारे एकत्र चर्चा करू शकतात. कोणत्याही समस्येवर चर्चा करू शकतात. त्यास सामोरे जाण्यासाठी मार्ग शोधा आणि विविध समस्यांसाठी योजना तयार करू शकता. या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांची मते व्यक्त करण्याची आणि निर्णय घेण्यास सहकार्याने आणि कार्यसंघाला चालना देण्यासाठी क्षमता सुधारण्यास मदत होते.

### अभिरूप संसद म्हणजे काय?

अभिरूप संसद ही विधानसभेच्या कार्यवाहीची एक मनोरंजक प्रत आहे. भारतीय संसद ब्रिटनच्या वेस्टमिन्स्टर संसदीय प्रणालीवर आधारित आहे. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र आणि सामाजिक आणि राजकीय जीवनाचे शिक्षण शिकण्याची संबंधित काही मुद्दे समजून घेण्यासाठी समजावून सांगण्यासाठी ही क्रिया किंवा सुशिक्षित युक्ती आहे. ही युक्ती समाजात चांगल्या सामाजिक कार्यास चालना देण्यासाठी वापरली जाऊ शकते.

### लोकसभेबद्दल सामान्य माहिती

लोकसभा सभागृहात 550 सभासद बसण्याची व्यवस्था असते. बैठक व्यवस्था प्रत्येक 11 ओळींसह 6 ब्लॉकमध्ये ठेवल्या आहेत. सभापतीची खुर्ची उजवीकडील आणि ब्लॉक नंबर 1 वर आहे आणि डावे ब्लॉक नंबर 6 हे दोन्ही ब्लॉक आहेत. उरलेल्या 4 ब्लॉकमध्ये प्रत्येकी 89 खुर्ची आहेत. लोकसभेच्या प्रत्येक सदस्याला चेंबरमध्ये जागा दिली जाते. सभापतींच्या खुर्चीची जागा आणि सत्ताधारी पक्षाच्या जागा, डाव्या आणि विरोधी पक्षांच्या सदस्यांची जागा उपसभापती डाव्या बाजूला पहिल्या ओळीच्या आसनावर बसतात. जागावाटप हे पक्षाच्या बहुमतानुसार केले जाते परंतु वरिष्ठ सदस्यांच्या बाबतीत जरी त्यांच्या पक्षाकडे कमी बहुमत असेल किंवा स्वतंत्र सदस्य असला तरीही ते निर्णय घेण्याच्या अधिकाराखाली असतील.

### महत्त्वपूर्ण शब्द – विचार आणि चिंतन

**लोकसभा** – लोकसभेला जनसमूहाची सभा आणि संसदेची खालची सभा असेही म्हटले जाते. लोकसभेचे सदस्य सार्वत्रिक प्रौढ मताधिक्याने त्यांच्या मतदार संघाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवडले जातात. सार्वत्रिक निवडणुकांनंतर लोकसभा स्थापन केली जाते. ती 5 वर्षे किंवा मंत्री परिषदेच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपतींकडून विसर्जित होईपर्यंत कार्य केले जाते.

**अध्यक्ष** – लोकसभेचे पीठासीन अधिकारी भारतात आहेत. लोकसभा नेते – भारतीय संसदेच्या खालच्या सभा स्थानाचा नेता सामान्यतः पंतप्रधान असतात जर ते लोकसभेचे सदस्य असतील तर जर पहिले पंतप्रधान संसदेच्या खालच्या सभासदाचे सदस्य नसतील तर ते दुसऱ्या मंत्र्यांना सभागृह नेते म्हणून नियुक्त करू शकतात.

**विरोधी पक्ष नेते** – हे संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सरकारने निवडलेला नेता. लोकसभेत किमान 55 जागा मिळवलेल्या पक्षाच्या नेत्याला त्याचा अधिकृत दर्जा देण्यात आला आहे.

**प्रश्नोत्तराचा तास** – हा लोकसभेत दररोजच्या सत्राचा पहिला तास असतो. प्रश्नोत्तराच्या वेळी सदस्यांना प्रशासन आणि सरकारच्या धोरणांच्या विविध बाबींवर मंत्र्यांना प्रश्न विचारता येता. ज्या मंत्र्यांची प्रश्नांची उत्तरे देण्याची वेळ आली आहे तो प्रत्येक मंत्री उभा राहून आपल्या विभागाच्या कामातील कमतरतेची उत्तर देतो.

**शून्य तास** – प्रश्नोत्तराच्या तत्काळानंतर झिरो आवर म्हणून ओळखला जातो. कारण दुपारच्या 12 वाजेच्या सुमारास याची सुरुवात होते. यावेळी सभासदांना आधी सूचना देऊन आपले महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करू शकतात.

मुद्दा – 1

**विषय : सांस्कृतिक वारशाबद्दल जाणीव जागृती**

**विरोधी नेते : प्रश्न**

आपल्या ऐतिहासिक वास्तू नष्ट होत आहेत याची शासनास जाणीव आहे का? या जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणाने होणाऱ्या कृतीकडे दुर्लक्ष प्रति एखादा कडक कायदा असावा का? याविषयी देशात समृद्ध, सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी काय करू शकतो?

**मंत्री – उत्तर**

आम्हाला माहीत आहे की आपला ऐतिहासिक वारसा आज असुरक्षित आहे. ऐतिहासिक स्थळे आणि स्मारके विविध प्रकारे नष्ट केली जातात. जणू आमच्या सोहळ्याच्या भिंतींवर काहीही लिहिले आहे किंवा ते हेतू पुरस्कर नष्ट झाले आहेत.

आमच्याकडे या संदर्भात आधीपासूनच बरेच कायदे आहेत जसे की एका विद्वानाने असे म्हटले आहे की अशा वारशाचा गैरवापर आणि कचरा रोखण्यासाठी कायद्याद्वारे शिक्कामोर्तब केले जाऊ शकत नाही तर शिक्षणाद्वारे सामान्य लोकांना जागरूक केले जाऊ शकते. ते केले जाऊ शकते.

आज लोकांवर जादा प्रभावशाली आहेत ते त्यांचीच मुले जी उद्या एक सामान्य जनता असेल. या क्रियाकाळामध्ये विद्यार्थ्यांना शिक्षित करताना केवळ समाजाला जागृत करता येत असे नाही तर त्यांचे आई–वडील–मित्र यांनाही त्यातून माहिती मिळत असते. यामुळे समाजात केवळ लुटूपुटू करण्यापेक्षा समाज विनाशापासून दूर किंवा सुरक्षित राहण्यासाठी प्रोत्साहन देणे ही एक महत्त्वपूर्ण भूमिका शिक्षण निभावू शकतात.

आपण विद्यार्थ्यांना आपल्या पाठ्यपुस्तकांमधून वेगवेगळ्या ऐतिहासिक स्मारकांबद्दल शिकविता आणि कधी कधी त्यांना परिसर भेट क्षेत्र भेटीसाठी घेऊन जातो. या विषयात सुरू असलेल्या वारसा सप्ताहाच्या निमित्ताने त्यांना जादा माहिती देणे, जागृत करणे आणि आपला समृद्ध वारसा याविषयीची चर्चा युवा पिढीला सशक्त बनविण्यासाठी आपण असफल झाल्याचे चित्र आहे. ए.एस.आई आणि विभिन्न प्रकारची संग्रहालये विद्यार्थ्यांना जागृत करण्यासाठी आपला वारसा जपण्यासाठी संवेदनशील बनविण्यासाठी काही कार्यक्रम आयोजित करतात पण केवळ नाममात्र असते. या कार्यक्रमातील अनियमितता, अपुरे प्रयत्न विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आपली सांस्कृतिक वारसा कसा आहे हे समजून घेताना अडचणी येतात. शासकीय संग्रहालये, शैक्षणिक संस्था व नागरिकांचे गट यांनी एकत्र येऊन यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सांस्कृतिक वारसा जपण्याच्या दृष्टीने सर्व लाभार्थींनी सहकार्याने सक्रिय होणे गरजेचे आहे. सांस्कृतिक वारश्यांबाबतचे शिक्षण मुलांच्या अध्ययन प्रक्रियेचा महत्त्वाचा घटक असावा. यामुळे केवळ इतिहास व समाज याबद्दल विद्यार्थ्यांना समजण्याबरोबरच मूल्यांची रुजवणूक होईल. ज्यामुळे आपला सांस्कृतिक वारसा भविष्यातील पिढीसाठी सुरक्षित राहिल.

मुद्दा – 2

**विषय :** वन कवच (फॉरेस्ट कवर) संबंधित चिंता

**विरोधी पक्ष नेता.**

यात भारत सरकारने भारतामध्ये जंगलाचे कवच (आच्छादन) वाढवण्यासाठी कोणता पुढाकार घेतला आहे का? जर हो असेल तर सरकारने कोणकोणते प्रयत्न केले आहेत?

**मंत्री :** उत्तर (पर्यावरण, वन आणि जल वायू परिवर्तन मंत्रालय)

'अ' आणि 'ब' भारतामध्ये जंगल आच्छादन वाढविण्यासाठी राष्ट्रीय वृक्षारोपण कार्यक्रम, ग्रीन इंडिया मिशन अशी वेगवेगळी केंद्र प्रायोजित योजनांच्या अंतर्गत झाडे लावण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. या योजनांमध्ये पर्यावरण, वन आणि जलवायू (ऑक्सिजन) परिवर्तन मंत्रालय यांच्या द्वारे भारतातील वन क्षेत्राचे संरक्षण पुनर्स्थापना किंवा संवर्धन जलवायू (ऑक्सिजन) परिवर्तनाचे काम करणार आहेत. राष्ट्रीय वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये लोकांच्या माध्यमांतून वृक्षारोपण केले जाईल. वेगवेगळ्या प्रकारची रोपे लावून भारतामध्ये जंगल आणि झाडांची वृद्धी झालेली दिसून येते.

## मुद्दा – 3

**विषय :** कृषी (शेती)

प्रश्न – इतर देशांच्या तुलनेमध्ये आपल्या देशातील शेती उत्पादन कमी आहे? जर असे असेल तर कृपया विवरण उपलब्ध करावे.

उत्तर – भारतामध्ये शेती क्षेत्रात वेगवेगळ्या पिकांचे उत्पादन काही देशांच्या तुलनेत अधिक आहे. भारतामध्ये वेगवेगळ्या पिकांचे उत्पादन वाढविण्याचे स्तर उल्लेखनीय आणि प्रगती दर्शक आहेत. जे मागील पाच दशकांच्या तुलनेत तीन पटीने वाढलेले दिसतात. शेती उत्पादन हे मुख्यत्वे 275.68 करोड टन या प्रमाणे खाद्यान्न उत्पादन झालेले आहे. यामुळे केवळ शेतकरी समृद्ध झाला नसून शेतकऱ्यांचे जीवनमान देखील उंचावलेले आहे. एवढेच नव्हे तर आपल्या देशाचे अन्न आणि पोषण सुरक्षितता पण निश्चित केली आहे.


### References and Other Suggested Readings (Module 1)

### A. Recent NCERT Publications

- *Barkhaa:* A Reading Series for All: Digital Version
- *Barkhaa:* A Reading Series for All: Print Version
- *Education of Minorities - Policies, Programmes and Schemes* - Frequently Asked Questions (Hindi, English and Urdu)
- *Educational Rights of Children with Special Needs* - Frequently Asked Questions (under publication)
- *Including Children with Autism in Primary Classrooms:* Teacher's Handbook
- *Including Children with Special Needs:* Primary Stage (Hindi and English)
- *Including Children with Special Needs:* Upper Primary Stage(Hindi and English)
- *Inclusion in Education:* A Manual for School Management Committees (under publication)
- *Modules for Enhancement of Quality of Education*– A Training Package
- *Tactile Map Book:* Upper Primary Stage

### B. Other interesting resources

- http://www.unescobkk.org/education/inclusive-education/resources/ilfe-toolkit/ilfe-toolkit-in-bangla/ Toolkit UNESCO: getting all children in school and learning
- Inclusive classroom observation checklist— https://www.bristol.gov.uk/documents/20182/239176 Inclusive+teaching+checklist.pdf/c6e3124e-bb02-4979-8de4-6d31c66dfd53
- Inclusive Education - Loreto School, Kolkata— https://www.youtube.com/watch?v=iyKm_QiNlHo
- Inclusive Education and Children with Disabilities | UNICEF— https://www.youtube.com/watch?v=rfWhQUz2J70
- IInclusive Learning: Everyone's In - Overview— https://www.youtube.com/watch?v=aTXtT05782Y
- Summary of the evidence on inclusive education— https://alana.org.br/wp-content/uploads/2016/12 Summary_of_the_evidence_on_inclusive_education.pdf
- Video-clip (animation) about the concept of inclusion and inclusive education— https://www.youtube.com/watch?v=MGPDqzhjtj0&t=6s
- Video clip about listening to children with disabilities— https://www.youtube.com/watch?v=R-IQaN04PF4
- Understanding and responding to children in inclusive classrooms— http://unesdoc.unesco.org/images/0012/001243/124394e.pdf


❑❑❑